# प्रभुतरुण

| वर्ष ४९ | अंक ८ | मुंबई | फेब्रुवारी २०१६ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)*

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**

*कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटये**

*संपादकीय*

## ‘प्रकाशाची दारे’

**—सुहासिनी कीर्तिकर**

अलीकडेच ‘नटसम्राट’ चित्रपट पाहिला. दमदार, चिरंजीवी नाटकांवर चित्रपट येताहेत अलिकडे. ताजं उदाहरण म्हणजे अगदी आपल्या काळजातच घुसलेली ‘कट्यार’. तसं पाहिलं तर फार पूर्वीपासूनच चांगल्या कथा-कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले आहेत. चिं. य. मराठे यांच्या कथेवर ‘अमर भूपाळी’ आला. रसिकांच्या काळजात अमर झाला. वि. स. खांडेकर, चिं. वि. जोशी, य. गो. जोशी यांच्या कथा कादंबऱ्या तर घटनांना, घटितांना भरपूर वाव देणाऱ्या. मनाच्या पडद्यावर आकारणाऱ्या त्यांना पटकथाकारांनी पडद्यावर आणून त्यांचे सोने केले. व्यंकटेश माडगूळकरांनी कथाकार आणि पटकथाकार अशा दोन्ही भूमिका समर्थपणे निभावल्या. ग. दि. माडगूळकरांचे ‘दो आँखे बारह हाथ’ काय; किंवा अगदी जी. ए. कुळकर्णींसारख्या लेखकाची ‘कैरी’ कथा काय; पटकथा म्हणून चित्रपटसृष्टीत ठसा उमटवून गेलेल्या या साहित्यकृती. ‘सांगते ऐका’, ‘स्मृतिचित्रे’ सारखी आत्मचरित्रे, साने गुरुजींची ‘श्यामची आई’, सावरकरांची, सुभाषबाबुंची चरित्रे चित्रपटसृष्टीला पटकथेचा ऐवज देऊन गेली. चरित्रांवर आधारित ‘बालगंधर्व’ हे अगदी ताजे उदाहरण. ‘लोकमान्य टिळक’ही पाठोपाठ पडद्यावर झळकले. पण या सगळ्यात नाटकांवर आधारित पटकथा तुलनेने फार थोड्या. ‘संशयकल्लोळ’ वर चित्रपट आला होता पूर्वी. (आता शास्त्रीय संगीताची मैफल सजवणारे ‘संशयकल्लोळ’ नाटक पुष्कर क्षोत्री नव्याने रंगमंचावर आणतोय. का? तर ‘बालगंधर्व’, ‘कट्यार काळजात घुसली’ मधल्या शास्त्रीय संगीतावर आधारित गाण्याने तरुणाईलाही वेड लावले आहे. परस्पर पूरक अशा या कला ठरताहेत. वेड लावताहेत.) पण अगदी अलीकडचे नाटकांवर चित्रीत झालेले दोन चित्रपट खासच. ‘कट्यार काळजात घुसली’ आणि ‘नटसम्राट’.

त्यात ‘कट्यार’ मध्ये गाणी आणि संगीतात नवीन, उचित भर टाकली आहे. त्यात कव्वाली रंगली आहे. पण संहितेत फार बदल नाहीय. ‘नटसम्राट’ मध्ये मात्र चित्रपटाचा पडदा समोर ठेवून नवीन पात्रे आली आहेत. गतस्मृती, वर्तमानकाळ असा गोफ विणला आहे. (म्हणजेच सोप्या मराठीत ‘फ्लॅश बॅक’!) विठोबा या पात्राला फक्त अस्तित्व दिले आहे. बेलवलकरांना सांभाळणारा बूटपॉलिशवाला एकमेव न दाखवता त्याची ‘भंगार’ वस्तीच चित्रीत झाली आहे. बघताना अंगावर यावे असे ‘पोलिसी खाक्या’चे चित्रण आहे. नाटकात दृश्य चित्रमयता असते, इथे दृश्यांत नाट्यमयता (‘नाट्य’नव्हे!) आणली आहे. नाटकात ‘सरकार’चे जाणे चटका लावून जाते. सिनेमात सरकार हळुहळू ‘मरत’ जातात; त्यामुळे नाटकात सैरभैर झालेले बेलवलकर सिनेमात दोर कापलेल्या पतंगाप्रमाणे भरकटत जातात. एक मात्र खरे की तरीही अभिनयाच्या अंगगत बळावर कलाकारांनी ‘नटसम्राट’ जीवंत केला आहे. सर्वच कलाकारांनी! आता याच चित्रपटात काही नवीन भर टाकून दोन मित्रांची अभिनयाची जुगलबंदी वाढवली आहे म्हणतात.

या पटकथेत वेगळी भर टाकण्याबद्दल किंवा कथेतही काही फेरफार करण्याबद्दल हरकत घेण्याचे काहीच कारण नाही. ते स्वातंत्र्य माध्यमांतर करताना (म्हणजे कथेचा चित्रपट, कवितेचे नाटक, नाटकाचा चित्रपट हे माध्यमांतर झाले.) प्रत्येक लेखक, दिग्दर्शक, कलाकाराला असतेच. कारण प्रत्येक माध्यमाची गरज वेगळी असते. पहा ना! विजय तेंडुलकरांचे गाजलेले ‘कमला’

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## धर्मेच, अर्थेच, कामेच...

**- सौ. त्वरिता संजय दळवी**

टी.व्ही.वर क्राइम पेट्रोल पाहताना माझे मन विचलीत झाले. तसं हल्ली इतक्या घटना घडतात की मन विचलीत होणे, हादरणे, घाबरणे, हे रोजचेच झाले आहे.

अवघ्या दहा वर्षांच्या चिमुरडीला तिच्याच जन्मादात्रीने गायब केले. दुसऱ्या पतीच्या संगनमताने आणि ओळखीच्या व्यक्तीच्या सहाय्याने, आपल्या पोटच्या पोरीला तिने रेल्वे स्थानकावर सोडून दिले. नशिबाने ती मुलगी चुकीच्या माणसांच्या हाती लागली नाही. परिस्थितीचा अंदाज आल्यावर त्या चुणचुणीत मुलीने स्वत:च्या हुशारीवर आपल्या एका नातेवाईकाच्या घरचा मार्ग धरला. दोन अज्ञात पण चांगल्या स्त्रियांनी तिची मदत केली. ती मुलगी आज सुखरूप आणि सुखात आहे. पोलिसांच्या तपासात असे सिद्ध झाले की, विवाहबाह्य संबंधातून हे सारे घडले. माझ्या मनात विचार आला की असले प्रेम काय कामाचे, ज्याच्यामुळे सख्ख्या नात्याचा विसर पडतो, आपण दुसऱ्यावर अन्याय करतो. असे वागणारे प्रेमीजन खरंच एकमेकांवर प्रेम करतात का त्यांच्यात निव्वळ आकर्षण असतं, का तीव्र आसक्ति, का ते परिस्थितीमुळे हतबल असतात?

काही वडीलधाऱ्या मंडळींच्या मते, सिनेमातील नायक-नायिकेचे प्रेम व प्रणय दृश्ये पाहून सामान्य माणसांच्या आयुष्यातील प्रेम प्रकरणे जास्त प्रमाणात वाढली आहेत. चित्रपट नव्हते तेव्हासुद्धा प्रेम प्रकरणे व्हायची. पण सिनेमाच्या प्रभावामुळे पुष्कळसे प्रेमी उघड-उघड आपल्या भावना दर्शवू लागले. प्रेम विवाहांवरील अंकुश खुपसे बोथट झाले. ज्याच्यावर प्रेम केले त्याच्याचबरोबर विवाहबंधनात अडकले की चित्रपट हॅपी एंडिंगमध्ये गणला जाऊन तिथेच संपतो. या उलट वास्तवात, विवाहानंतर खऱ्या आयुष्याला सुरुवात होते. समाजात विवाह संस्थेला एक विशिष्ट स्थान आहे. तसे हल्ली लग्न न करता एकत्र राहण्याची प्रथा आपल्या कडेही उमलू लागली आहे. पण फार थोड्या प्रमाणात. पतीपत्नी म्हटले की दांपत्याकडे आदराने पाहिले जाते. खरं म्हणजे विवाहानंतरचा प्रवास कुणासाठीही सोपा नसतो. प्रत्येकाला तडजोड ही करावीच लागते. सर्वगुणसंपन्न असा जोडीदार सर्वांना हवा असतो पण कुणालाच मिळत नाही. अगदी द्रौपदीला सुद्धा पाच पांडवांत आपला इच्छित गुणसंपन्न वर शोधावा लागला होता. आपल्या जोडीदाराच्या गुणांची संख्या अवगुणापेक्षा जास्त असेल तर विवाहाची रजत आणि सुवर्णजयंती कित्येक जोडपी साजरी करू शकतात तर काही जोडपी एकमेकांच्या गुणांची बेरीज वजाबाकी न करत बसता, ‘पदरी पडले पवित्र झाले’ म्हणत आपल्या सुखी संसारात रमतात.

दोन भिन्न प्रकृतीच्या, प्रवृत्तीच्या व्यक्ती जेव्हा लग्नाच्या बेडीत अडकतात आणि एका छताखाली हसत खेळत, कधी भांडत, कधी रडत एकत्र जीवन व्यतीत करण्याची जबाबदारी स्वीकारतात तेव्हा संसाररुपी प्रयोगाला सुरुवात होते. संसाराच्या ह्या नाट्यात अनेक सहकलाकार असतात. पण मुख्य भूमिका मात्र पती-पत्नीच वठवत असतात. ह्या दोघात जेव्हा तिसरा/तिसरी कुणीतरी डोकावते किंवा दोघातील एक किंवा दोघेही घराबाहेर डोकावतात, तेव्हा मात्र नाटकाचे रूपांतर सिनेमात होते.

तसे पाहता हा एक गंभीर विषय आहे. आपल्यातील कित्येकांना वाटते की विवाहबाह्य संबंध असणे ही विदेशी संकल्पना आहे किंवा चित्रपट तारकांची वा उच्चभ्रू समाजाची मक्तेदारी आहे. पण सामान्य परिस्थितीत राहणाऱ्या आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या कुटुंबातही अशा गोष्टी सर्रास पहायला मिळतात. असं म्हणतात Man is Polygamous by Nature! निसर्गत: पुरुष बहुपत्निकत्वगामी असतो. एकाच जोडीदारासोबत आयुष्यभर राहणे काहींना कठीण वाटते.

वरच्या म्हणीतील Man म्हणजे मनुष्यप्राणी असा अर्थ लावणे जास्त योग्य ठरेल. कारण कित्येक स्त्रियांनाही असलेल्या जोडीदारापेक्षा दुसरा जोडीदार हवाहवासा वाटतो. पण फक्त विरंगुळा

(पान २ कॉलम ३ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

नाटक सध्या मालिकारुपात आपण पहातो आहोत. गरजेपोटी त्यात किती, किती पाणी घातले आहे! 'नटसम्राट' सिनेमाची गरज म्हणूनच 'नटसम्राट' नाटकाला मांजरेकरांनी वेगळे रूप दिले. बरोबरच आहे. हा चित्रपट बघून आल्यावर मला शिरवाडकरच स्वत: या नाटकावर पटकथा लिहीत होते, त्याची आठवण झाली. आठवणीत असंही आलं की बेलवलकर या नटसम्राटाची माणूस म्हणून व्यक्तिरेखा दाखविण्याचा त्यांनी त्या पटकथेच्या दृश्यांत (दृश्य तुकड्यांत) प्रयत्न केला होता. या आठवणीनं मला काही काळ झपाटलंच की हो. मांजरेकरांनी बेलवलकर चित्रपटात उभा केलाय; वि. वा. शिरवाडकरांनी आपल्याच या मानसपुत्राला चित्रपटात कसं बरं उभं केलंय - हे पहाण्याचा मोह आवरेनासा झाला. या झपाटलेपणानं मग मी माझ्याकडे असलेल्या पुस्तकांची उचकपाचक करण्याचा झपाटाच लावला. अन् हो! अखेरी 'ते' पुस्तक सापडलं.

'पॉप्युलर प्रकाशना'नं 'प्रकाशाची दारे' हे वि. वा. शिरवाडकरांचं पुस्तक प्रसिद्ध केलंय. २००२ मध्ये. वसंत सं. पाटील. श्री. शं. सराफ, रेखा भांगरे यांनी ते संपादित केलंय. तात्यासाहेब शिरवाडकरांनी आपल्या इच्छापत्रात त्यांचे असंग्रहित व अप्रकाशित साहित्याचे संपादन या त्रयीवर सोपवले. त्यातून या पुस्तकात शिरवाडकरांचे असंग्रहित / अप्रकाशित साहित्य 'प्रकाशाची दारे' खुली करत आले आहे. याच पुस्तकात 'नटसम्राट' नाटकावरून पटकथा करावी अशी इच्छा मनाशी धरून तात्यासाहेबांनी काही दृश्यं अपुऱ्या स्वरूपात लिहिली आहेत. चांगली ६५ ते ८७ अशा पानांत विखुरलेली अकरा दृश्ये आहेत ती. त्यात दिग्दर्शकाला उपयोगी पडाव्यात अशा सूचनांचाही समावेश आहे. ती दृश्ये अशी- रंगभूमीवरून निवृत्त होऊन नटसम्राट गणपतराव बेलवलकर (अप्पा) आपली पत्नी कावेरीसह स्वत:च्या गावी चालले आहेत असे पहिले आगगाडीमधील दृश्य. 'रात्र भयानक - खंत कशाला? काळोखासही असे किनारा, ध्वज सूर्याचा घनात रोवित नभात येईल पहाटतारा' अशा कवितेतून अप्पा कावेरीला सकारात्मकता शिकवतात. 'टी.सी.' सकट सारे दाद देतात. 'टी.सी.' आणि 'अप्पा' यांचे संभाषण मांजरेकरांनी उभ्या केलेल्या अप्पा बेलवलकरांचीच प्रतिमा आहे. दुसरं दृश्य 'स्टेशन'. या स्टेशनावरच त्यांना सात आठ वर्षांची, फाटके कपडे घातलेली, मुकी, दलित अशी (नवीन 'चिमणी') छबी भेटते. पुढे चहाच्या टपरीवर तिला बाहेर हाकललेली असता अप्पा तिच्या बाजुनं उभे रहातात. 'ए, लांडग्या, खबरदार तिच्या अंगाला हात लावशील तर. या काठीनं तुझ्या टाळक्याचे चार तुकडे करीन.' म्हणत चहा न पिताच, पैसे न घेताच ते छबीला घेऊन बाहेर पडतात. हा अप्पा बेलवलकर नाटकातला नाही. 'नटसम्राट' आहेच; पण समाजातला सुधारक, निर्भीड वृत्तीचा आहे. या छबीला ते कापड दुकानातून कपडे घेऊन देतात. दुकानदार विचारतात, 'ही पोरगी कुठे सापडली आपल्याला?' तेव्हा अप्पा म्हणतात, 'ती मला सापडली नाही, मी तिला सापडलो.' नटसम्राट म्हणून गाडीतला टी.सी., दुकानदाराचा रुग्ण शय्येवर असलेला बाप अप्पांना खूप दाद देतात; पण हा 'माणूस' म्हणून असलेला 'बाप' माणूस छबीलाच सापडतो! दुकानदाराच्या 'बाबां'बरोबरचे दृश्य 'नटसम्राट' म्हणून अप्पांना पावती देणारे आहे. पण त्याच जोडीने चित्रपटाची दृश्य ताकद जाणून हे 'बाप'पण शिरवाडकरांनी उभे केले आहे. एकाच वेळी कला अणि समाज यांचा घातलेला हा सुंदर मेळ! तो मांजरेकरांच्या चित्रपटात फारसा दिसत नाही. अपवाद एकच. पोलिस रस्त्यावरच्या आधार देणाऱ्या कामकऱ्याला तुडवतात तेव्हा अप्पा गरजतात, 'या थिएटरमध्ये मी राजा आहे. खबरदार त्याला हात लावाल तर.' अशावेळी ती एका 'नटसम्राटा'ची आज्ञा असते. माणुसकी जपणाऱ्या अप्पांची नव्हे! अशा 'नटसम्राटा'चीही दृश्यं शिरवाडकरांनीही संकल्पित सिनेमात टाकली आहेतच. 'अप्पांचे घर' या दृश्यात ती टाकली आहेत. बालगंधर्वांच्या अलौकिक अभिनयाचं रूप सांगणारा त्यांचा कावेरीबरोबरचा संवाद केवळ अप्रतिम. ''मात्र नाटकातली ही दोन गाणी - 'दया छाया' आणि 'प्रभु अजि गमला'. 'दया छाया'ची दोन आवर्तनं झाली की प्रेक्षालयात एका माणसाच्या नव्हे; तर मानवजातीच्याच सोलीव दु:खाच्या काजळलाटा सर्वत्र वाहत आहेत असं वाटायचं. या शब्दांत चारशे हंबरडे गोठवून ठेवले असायचे. तर 'प्रभु अजि' च्या वेळी आनंदाचंही वादळ कसं असू शकतं, याचा प्रत्यय यायचा.''- असा संवाद म्हणजे केवळ अलौकिकाचा स्पर्श झालेला.

या अलौकिकाच्या स्पर्शासह नाट्यमयता वाढविणारा खेळकर विनोदही या समर्थ लेखकानं पेरला आहे. हे 'एकच प्याला' नाटक कावेरी बघते, विरघळते. पण पुढे म्हणते की, ''आणि तरीही घरी आल्यावर एक फार मोठं समाधान मला मिळालं-'' आप्पा म्हणतात, ''आपण सिंधू नाही हे!'' तर कावेरी हसत म्हणते, ''नाही, समाधान हे होतं की तुम्ही सुधाकर नाही.'' मग मोठ्याने हसत अप्पा पुढे पुस्ती जोडतात, ''आमचं दैवत - कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर - काकासाहेब यांचं मत वेगळं होतं. ते नेहमी म्हणायचे, हा आमचा गणपत म्हणजे हातात दारूचा पेला नसलेला सुधाकरच आहे.'' 'नटसम्राट'मध्ये म्हणजे चित्रपटात हाच गणपत हातात जांभळीचा पेला घेऊन पार्टीचा बेरंग करताना दिसतो. खाडिलकरांचा 'आमचा गणपत' म्हणजे वि. वा. शिरवाडकरांचा 'नटसम्राट' तो त्यांच्या पटकथेत असा वेगळा दिसतो. त्यापुढचं त्यांनी दिलेलं एक दृश्य काव्यात्म, बहारीचं आहे. म्हणजे 'कट्यार' मध्ये जसे काजव्यांचे काव्यात्म 'मैफल दृश्य' आहे तसेच. छबीमुळं इतर मुलांनाही अप्पा शिकवतात, पण ते आता गाव सोडून जाणार असतात. तर ही मुलं अन् त्यांच्या आया कार्तिकी पोर्णिमेला देवळाच्या घाटावर रात्री निरोप समारंभ आयोजित करतात. त्याला नाव पहा; किती किती सुंदर! 'चांदण मिठी'चा कार्यक्रम. मग तो चांदण मिठीचा चांदण्या रात्रीचा खेळांचा, गप्पांचा, गाण्याचा कार्यक्रम करतात. अर्थात त्यात कुसुमाग्रजांनी लिहिलेले 'चांदणे' हे गाणे अपरिहार्यपणे येतेच.

'पुनव नसे वा चांद नसे
हे गगनाचे गीत असे
हासत नाचत खेळत त्या
स्वरगंगेमधि नाहणं।। अहा हे सुंदर किति चांदणं।'

मग एक भैरवीथाटात भजन.

नुसता हा अपुरा पटकथेचा आराखडा पाहिला तरी वाचता वाचता त्याची आपल्याला 'चांदणमिठी' घट्ट पडतेच. मनात येऊन जाते की शिरवाडकरांना ही पटकथा पूर्ण करता आली असती तर? कुणाला ठाऊक; त्यात 'नटसम्राट' म्हणून खुद्द नटवर्य श्रीराम लागूंनीच किंवा दत्ता भटांनीच काम केलं असतं! काही हरकत नाही. तेथे कदाचित् लागू असते, इथे आजच्या चित्रपटात पाटेकर आहेत. सगळेच 'नटसम्राट!' पण खुद्द नाटककारानेच लिहिलेली पटकथा अपुऱ्या स्वरूपात इथे त्या निमित्ताने पडताळून पहावीशी वाटली.

'प्रकाशाची दारे' अशीही कधीकधी खुली होतात!

*

विस्तारित संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

किंवा स्वार्थापोटी कुणी अशाप्रकारे वागतं का? जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे! कारण, दिसतंतसंनसतं. बाहेरून कितीही चांगले दिसले तरी प्रत्येकाच्या घरात काय चाललंय हे त्या घरात राहणाऱ्यांनाच माहीत असतं.

काही ठिकाणी पती-पत्नीमध्ये संवाद असेल पण सुसंवाद नसू शकतो. दोघेही एकमेकांना अनुरूप नसू शकतात. दोघांच्या आवडी-निवडी, वागण्याची पद्धत भिन्न असू शकते. मग सर्व बाबींमध्ये नेहमीच जुळवून घेणे कठीण होत जातं. संसार म्हणजे नुसतंच 'एकत्र राहणे' नसतं.

सहसा, मनाने दुरावलेली/दुखावलेली माणसे बाहेर सुख शोधतात. म्हणजे 'नाही पटले दिले सोडून' असे कधीच नसते. कालांतराने असे घडत जाते. जेव्हा एकाचे विचार, प्रयत्न करूनही, दुसऱ्याला कळत नाहीत किंवा दुसरा ते समजून घेण्याचा प्रयत्नही करत नाही तेव्हा पहिल्याची केविलवाणी स्थिती होते. मनानेच नव्हे तर विचारांनीही दोघांनी जवळ येणे गरजेचे असते. अशा परिस्थितीत जर घराबाहेर अशी एखादी व्यक्ती त्यांच्या सानिध्यात आली, जिला त्यांचे विचार कळतात आणि त्यांच्याशी त्या त्या विषयांवर ती बोलू शकते, अशा वेळी त्या व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तिमत्वाकडे ते आकर्षिले जातात. त्या दोघांत केवळ विचारांची देवाणघेवाण करण्याइतपत संबंध असू शकतो. पण 'पती/पत्नी सोबत असताना तिसऱ्या कुणा बरोबर संवाद साधायची गरजच काय?' हा दुखावलेल्या जोडीदाराचा रोषाचा सवाल असतो. शरीराप्रमाणे वैचारिक मनाचीही भूक असते. जर जोडीदार ती भूक शमवू शकत नसेल तर मग अशी वैचारिक साथ देणाऱ्या मित्र किंवा मैत्रिणीची त्यांच्या आयुष्यात हजेरी लागते.

हॉटेलात गेल्यावर कित्येकांना दुसऱ्याच्या ताटात काय वाढलंय ते जास्त आकर्षक वाटते. त्याचप्रमाणे शेजारी किंवा मित्रपरिवारातील व्यक्तीबरोबर आपल्या जोडीदाराची तुलना माणसे करत असतात. उदाहरणार्थ, काही स्त्रियांना सासू सासरे घरात असणे पसंत नसते आणि असले तर त्यांच्यासाठी काही करणे त्यांना पसंत नसते. काही स्त्रियांना घरकामात जास्त रस नसतो. घराकडे घरच्यांकडे लक्ष देणं कंटाळवाणं वाटतं. अशा वेळी जर मित्राची बायको आपल्या सासू-सासऱ्यांचा सांभाळ करत असेल, त्याचबरोबर गृहकृत्यदक्ष असेल, स्वयंपाक कलेत निपुण असेल, तर पुरुष तिच्याकडे आकर्षिला जावू शकतो. म्हणजे त्याचे आकर्षण शारीरिक किंवा वाईटपद्धतीचे नसते पण तुलनेत आपली पत्नी त्याला कमी वाटते. जर पती आपल्या पत्नीच्या मातापित्याचा मान ठेवत नसेल, आपल्या जबाबदारीत, कर्तव्यात कमी पडत असेल तर स्त्रीलाही या उलट वागणारा मित्र जास्त आवडू शकतो.

हेही एक प्रकारचे आकर्षणच असते. काहीवेळा पती किंवा पत्नी आपल्या जोडीदारावर अनेक बंधने घालतात जी हळुहळू जाचक होवू लागतात. जेव्हा जीव मेटाकुटीला येतो तेव्हा माणूस हातपाय मारून मोकळे होण्याचा प्रयत्न करतोच.

पती-पत्नी शारीरिक संबंधात सुखी नसतील तर काहीजण ते सुख बाहेर शोधतात. समाज याला पाप म्हणून मोकळा होतो. पण सुख शोधणे, सुख मिळवणे पाप कसे? हा वादाचा मुद्दा आहे. जर

(पान ४ कॉलम ३ वर)

लेख क्रमांक २

# दूरदेशातून- DISCIPLINE

-By Sujan Rane
from USA. Sujanrane@yahoo.com

*(शीर्षक इंग्रजीतच असावे असा लेखकाचा आग्रह आहे. -संपादक)*

शिस्त हा उन्नतीचा पाया आहे असं कोठेतरी वाचलं होतं. मी एक अमेरिकन रहिवासी असून गेली २० वर्षे अमेरिकेत राहत आहे, तरीपण मला आपल्या देशाबद्दल अत्यंत अभिमान वाटतो. तसा आपल्या देशातल्या रोजच्या जीवनशैलीबद्दल वाटत नाही, कारण त्यात मला शिस्तीचा पुष्कळच अभाव दिसतो. केव्हा केव्हा असं वाटते की बेशिस्तपणा हा जात्याच भारतीयांच्या स्वभावाचा भाग आहे की काय? हा प्रश्न भंडावून सोडतो. तसं बघायला गेलं तर भारताने आर्थिक दृष्ट्या बरीच प्रगती केली आहे. मी जेव्हा जेव्हा भारतात येतो; तेव्हा बघतो की रेस्टॉरन्टस् संध्याकाळी भरलेली असतात, लोक आधुनिक पद्धतीचे कपडे सर्रास वापरताना दिसतात, म्हणजे तरुण मुली मांड्या दिसतील एवढे तोकडे फ्रॉक घालतात तर; तरुण मुलं बिनबाह्यांचे शर्टस् व दादा कोंडके पद्धतीच्या शॉर्टस् वापरतात व मनगटावर जेवढी मोठी घड्याळं वापरताना दिसतील तेवढी वापरतात. आणि सर्वांवर मात म्हणजे आपल्याकडे कमीतकमी तीन गाड्या व तीन फ्लॅटस् आहेत हे सर्वांना दिमाखाने सांगणे. ही आर्थिकदृष्ट्या प्रगती आहे; पण सामाजिकदृष्ट्या उन्नती आहे का असा प्रश्न पडतो. कारण प्रगती आणि उन्नती ह्या दोन शब्दांत चांगलाच फरक आहे असं मला वाटते. पाश्चिमात्य संस्कृतीत जे वाईट त्याचं अनुकरण आपण पटकन करतो, त्यात जे चांगले आहे त्याच्याकडे दुर्लक्ष करतो. असं का? हा शिस्तीच्या अभावाचा परिणाम आहे असं राहून राहून वाटते. जर आपण जबाबदारीने वागलो तर असं दृश्य दिसणार नाही.

अमेरिकेत रोजच्या जीवनात भरपूर शिस्त आहे, हे त्यांच्या उन्नतीचं बोधचिन्ह आहे असं कोणालाही पटण्यासारखे आहे. रस्त्याच्या कडेला कचरा टाकला जात नाही. प्रत्येक मॉलमध्ये, दुकानात व कार्यालयात कचऱ्याचे डबे असतात व त्यात प्लास्टिकच्या पिशव्या असतात, त्यामुळे डबे भरल्यावर कचरा उचलायला सोपे जाते. ठिकठिकाणी बोर्डस् लावलेले असतात की कचरा करणाऱ्यांना १००० डॉलर म्हणजे रु. ६५,०००/- दंड भरावा लागेल. त्यामुळे लोकांना आपोआप कचरा डब्यात टाकण्याची सवय लागते. आपल्याकडे स्वच्छतेची मोहीम सुरू झाली आहे ही कौतुकाची बाब आहे. पण शिक्षा कडक असेल तर लोक त्याचं पालन करतील. शेवटी शिस्तीच्या अभावाकडे आपलं लक्ष जाते. अमेरिकेत तुम्ही विमानतळांवर किंवा रेल्वे स्टेशनवर जा. तिथे लोक रांगेत शांतपणे उभे दिसतील. तसंच तुम्ही कुठल्याही दुकानात, बँकेत किंवा डॉक्टरच्या दवाखान्यात जा, तुमचं स्वागत हसतमुखाने केलं जाते. सीएनएन या टी.व्ही. चॅनेलवर सध्या अमेरिकेत प्रेसिडेंशियल इलेक्शनवर डिबेटस् चालतात ती नुसती ऐकण्यासारखी नाही; पण बघण्यासारखीसुद्धा असतात. ही डिबेटस् किती शिस्तीने व दिमाखाने केली जातात याचं आपल्या टाईम्सनाऊच्या अर्नाब गोस्वामीने अनुकरण केलं पाहिजे. आपल्या डिबेट्समध्ये भाग घेणारे एकमेकांवर ओरडत असतात. दुसऱ्याला बोलून देत नाहीत, स्वत: अर्नाब दुसऱ्यांना बोलून देत नाही. शिवाय प्रत्येकाला वेळेचं बंधन दिलं जात नाही. त्यामुळे आपली डिबेटस् म्हणजे मच्छीबाजारसारखी वाटतात. जिथे विषयासंबंधी दिशा दिसत नाही. नुसता गजबजाट दिसतो. हे अनुभवल्यानंतर कोणीही भारतीयांच्या बेशिस्तपणाकडे आपोआप बोट दाखवेल तर त्यात नवल नाही.

एखादं राष्ट्र मोठं होतं त्याच्यापाठी त्याची शिस्त कारणीभूत असते. पाश्चिमात्य राष्ट्र आशियायी व आफ्रिकन राष्ट्राच्या कितीतरी बाबतीत पुढे आहेत याचं कारण ती राष्ट्रं कुठलीही गोष्ट पद्धतशीर व शिस्तबद्धरित्या करतात. अर्थात ती राष्ट्रं शिक्षणाच्या क्षेत्रात अग्रगण्य असल्यामुळे त्यांना त्याचा फायदा होतो. तसा विचार केला तर भारत शिक्षणाच्या क्षेत्रात मागासलेला नाही, पण पुन्हा शिस्तीच्या बाबतीत पाश्चिमात्य देशांच्या कितपत बरोबरी करू शकेल हे उघड आहे. या संदर्भात एक किस्सा वाचण्यासारखा आहे. २५० ते ३०० वर्षांपूर्वी एका मराठे विरुद्ध ब्रिटीश सैन्यांत लढाई झाली व त्यात मराठ्यांच्याकडे ५०,००० तर ब्रिटिशांच्याकडे २५,००० सैनिक असूनसुद्धा मराठे हरले. लढाई संपल्यावर ब्रिटीश अधिकाऱ्याने मराठे अधिकाऱ्याला विचारलं, ''तुला याचं कारण माहीत आहे का? उद्या समुद्राकाठी तू तुझ्या सैनिकांना उभं रहायला सांग. त्याप्रमाणे मी सुद्धा माझ्या सैनिकांना सांगतो.'' दुसऱ्या दिवशी दोन्ही फौजा समुद्राकाठी शेजारी शेजारी अटेन्शनमध्ये उभ्या राहिल्या. समुद्राला भरती होती व पाणी जोरात वर जात चाललं होतं. समुद्राचं पाणी जसं जवळ यायला लागलं तसं मराठे सैनिक पळायला लागले. परंतु ब्रिटीश सैनिक त्यांच्या अधिकाऱ्याकडून आज्ञा येईस्तोपर्यंत तिथून हलायला तयार नव्हते. हा दोन सैन्यामध्ये फरक होता. ब्रिटीश सैन्याकडे कमी शिपाई असून लढाई जिंकण्यामागे त्यांची कडक शिस्त होती. हे उदाहरण शुल्लक आहे. पण त्यात पुष्कळ शिकण्यासारखं आहे.

अमेरिकेत टी.व्ही. चॅनेलवर भारतीय संसदेतला तमाशा पाहिल्यावर कीव येते. एखाद्या कायद्याला विरोध करायचा असेल तर स्पीकरच्या वेलसमोर एकसारखा गदारोळ करणं, एकमेकांच्या अंगावर धावून जाणं ही लोकशाहीची लक्षणं नाहीत. आपला मुद्दा सुसंस्कृतपणे मांडून एखादा कायदा शिताफीने पास करून घेण्यात आपली शिस्त दिसून येते. शेवटी अशी भीती वाटते की अशा बेशिस्त वातावरणात आपली प्रगती कितपत टिकेल? कारण अशा परिस्थितीचा फायदा एखादी बाहेरची शक्ती घ्यायला सहज उद्युक्त होईल. ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने अशाच भारतातील बेशिस्त वातावरणात आपलं हित साधलं. ह्या बेशिस्त वर्तनाला खीळ बसण्यासाठी आपल्या शिक्षणपद्धतीत अमुलाग्र बदल करावा लागेल म्हणजे प्रत्येक भारतीयाचा लहानपणापासून शिस्तप्रिय होण्याकडे कल असेल. तेव्हा भारतीयांनी आर्थिक, राजकीय व सामाजिक शिस्तीचं भान ठेवलं तर आपल्या प्रगतीचं रुपांतर उन्नतीमध्ये नक्कीच होईल व भारत एक मजबूत देश म्हणून ओळखला जाईल.

*

## पाठारे प्रभू सोशल समाज

रविवार, दिनांक १७ जानेवारी, २०१६ रोजी खारच्या हाऊसिंग सोसायटीच्या सभागृहात पा. प्र. सोशल समाज व पाठारे प्रभु को-ऑप. हा. सोसायटी यांच्या विद्यमाने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात रांगोळी, चित्रकला, हस्तकला या स्पर्धांबरोबर फॅन्सी ड्रेस, एकपात्री अभिनय या स्पर्धा दुपारी ३ ते ७.३० दरम्यान पार पडल्या. ८ वर्षांपर्यंत, १५ वर्षांपर्यंत आणि १५ वर्षांवरील असे तीन गट करण्यात आले होते. विशेष म्हणजे १५ वर्षांखालील गटांमधील स्पर्धकांची संख्या व उत्साह वाखाणण्यासारखा होता. रांगोळी, चित्रकला व हस्तकला या स्पर्धांचे परीक्षण सौ. श्वेता भूपेंद्र जयकर यांनी केले. तर फॅन्सी ड्रेस, संगीत व अभिनय स्पर्धांचे परीक्षण श्री. सुरेश राणे यांनी केले. निकाल जाहीर करताना परीक्षकांनी काही बहुमोल सल्ले दिले. तसेच स्पर्धांच्या विषय निवडीबद्दल कौतुकही केले. या प्रसंगी प्रेक्षकांची उपस्थिती लक्षणीय होती. सर्व उपस्थितांना समाजातर्फे कॉफी देण्यात आली. परीक्षकांचा परिचय समाजाच्या उपाध्यक्षा श्रीमती स्वाती जयकर यांनी करून दिला व परीक्षकांना मिठाई देऊन सन्मानित करण्यात आले. विजेत्या स्पर्धकांना समाजाचे विश्वस्त श्रीमती वंदना नवलकर आणि श्री. अजित तळपदे यांच्या हस्ते पारितोषिके वितरित करण्यात आली आणि सर्व स्पर्धकांना समाजातर्फे प्रमाणपत्रे देण्यात आली. तसेच यावर्षी श्री. नंदकुमार कृष्णराव विजयकरांतर्फे सर्व बच्चेकंपनी, स्पर्धकांना पारितोषिके देण्यात आली. याप्रसंगी श्री. नंदकुमार विजयकरांनी आपले मनोगतही व्यक्त केले. स्पर्धांचे निकाल पुढीलप्रमाणे-

१) **रांगोळी स्पर्धा**: (वेळ- १ तास), **अ-गट** : १५ वर्षांखालील, **विषय** : क्रिसमस ट्री

प्रथम क्रमांक- कु. रितिका राहुल जयकर,
द्वितीय क्रमांक- कु. आंचल शैलेश तळपदे,
तृतीय क्रमांक- कु. अश्विन असित तळपदे


**ब-गट** : १५ वर्षांवरील, **विषय** : नागऱ्या

प्रथम क्रमांक- सौ. श्वेता असित तळपदे,
द्वितीय क्रमांक- सौ. रेश्मा प्रसाद कोठारे,

(पान ६ कॉलम ३ वर)

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# नववर्ष

-सौ. उज्ज्वल ब्रह्मांडकर

*(नववर्षाचा हा दुसरा महिना. तरीही 'नववर्ष' मनात रेंगाळतेय. म्हणूनच ह्या लेखाचं प्रयोजन. -संपादक)*

आपणा सर्वांना नववर्षाच्या हार्दिक शुभकामना. ३१ डिसेंबरला रात्रीचे बारा वाजले की नववर्ष सुरू झालं असं समजलं जातं. हल्ली रात्री बारा वाजताच हे नववर्ष 'उजाडतं'. ही प्रथा खरं तर पस्तीस चाळीस वर्षांपूर्वीच सुरू झाली आहे. पूर्वी हा सोहळा फक्त पंचतारांकित हॉटेलांमध्ये पार पाडला जायचा. उद्योगपती, चित्रपट व्यवसायाशी निगडीत लोक, समाजातील प्रतिष्ठित, लब्ध प्रतिष्ठित, श्रीमंत, गर्भश्रीमंत, नवश्रीमंत लोक तिथे हजर असायचे - तेही खूप अगोदर प्रतिव्यक्ती भरपूर पैसे आगाऊ भरून टेबल आरक्षित करायचे. त्यांचं अप्रुप वाटायचं तेव्हा! आता अशा कुटुंबांची संख्या खूपच वाढलीय. हॉटेल्स कमी पडतायत. क्लब्ज ओसंडून वाहतायत.

नवीन वर्षाचा दिवस उजाडायचा तेव्हा मात्र हे सगळे लोक डाराडूर झोपलेले असायचे. आजही हे चित्र आहे तस्संच आहे. परंतु सामान्य घरांमध्ये मात्र नववर्षाच्या पहिल्या दिवशी पहाटे उठलं जायचं. तसंही चाकरमानी मंडळींची ती रोजचीच पहाटे लवकर उठायची सवय असायची, आजही आहे. फरक एवढाच की त्या पहाटे उठल्या उठल्या घरातल्या सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या जायच्या. ऑफिसमध्ये पोहोचल्यावर किंवा जाताना बसमध्ये, ट्रेनमध्ये सहप्रवाशांना, सहकर्मचाऱ्यांना शुभेच्छा देऊन व त्यांच्या शुभेच्छा घेऊन ऑफिसच्या दिवसाची सुरूवात व्हावयाची. हेच सगळं अजूनही त्याच ठराविक चाकोरीत, तसंच्या तसंच घडत असतं.

तसं पाहिलं तर काय नवीन असतं हो ह्या दिवशी? तोच सूर्य नेहमीसारखाच उगवतो. तेच निळंशार आकाश असतं. त्यात तरंगणारे तुरळक पांढऱ्या ढगांचे पुंजके तेच तसेच असतात. तेच पक्षी तशीच किलबिल करतात. सुंदर फुलं रोजच्या सारखीच सुंदर रंगांची आणि मस्त सुगंधाची उधळण करीत असतात. वातावरणात रोजच्या सकाळचीच प्रसन्नता असते. सूर्याची किरणं सकाळी नेहमीसारखीच ऊबदार वाटतात. आपणही तेच असतो. आपली कामंही तीच असतात. काहीही नवीन नसतं. जुनं वर्ष संपलं. दुसरं वर्ष सुरू झालं. ही मानवानंच आखलेली अदृश्य सीमारेषा ओलांडून प्रत्येकजण ह्या दुसऱ्या वर्षात स्वत:च्याही नकळत पदार्पण करतो. नाविन्य असतं ते आपल्या प्रत्येकाच्या नजरेत. त्या नजरेनं आपण निसर्गाकडे बघतो. तोच निसर्ग खूपच जास्त सुंदर भासतो. नाविन्य असते प्रत्येकाच्या मनात. ही मनामधली भावना महत्त्वाची. ती आपण परिधान केलेल्या नवीन कपड्यांमधून व्यक्त होते. नवीन कपड्यांवर सुंदर परफ्युमचा फवारा मारला जातो. मनामधली प्रसन्नता प्रत्येकाच्या चेहऱ्यावर विलसत असते. त्या दिवशी नेहमीची बस, ट्रेन चुकली तर उगीचच नवीन वर्षाची सुरूवात खराब झाल्याची चुटपुट मनाला लागते. पण असं व्हायचंच कधी कधी ही आपल्या प्रसन्न मनाची प्रतिक्रिया लगेचच मनातल्या मनात प्रकट होते. आपण प्रयत्नपूर्वक चुटपूट लागल्याचे उदास विचार मनाबाहेर ढकलून प्रसन्नतेचा मुखवटा धारण करून वावरतो. हे आपण नेहमीच केलं तर?

तर रोजच नववर्षाचा पहिला दिवस वाटेल आणि आपण रोजच आनंदी राहून कामं करीत राहू. माझी खात्री आहे की प्रत्येकाचं प्रत्येक काम व्यवस्थित पार पडेल कारण मन आनंदी असेल. त्यासाठी नववर्षाची वाट बघण्याची गरज राहणार नाही.

हे नवीन वर्षाचं महत्त्व गुढीपाडवा, दिवाळीचा पाडवा अर्थात बलिप्रतिपदा ह्या दिवसांनासुद्धा प्राप्त झालेलं असतं. तेव्हाही आपण प्रसन्न राहतो. तीच कथा प्रत्येक सणाची, संक्रांतीची आणि दसरा, अक्षय तृतीया ह्या साडेतीन मुहूर्तांमधील उरलेल्या दिवसांची, तसंच घरातल्या प्रत्येक व्यक्तीच्या वाढदिवसाची, नवीन घराच्या गृहप्रवेशाची वास्तूशांतीची आणि घरातल्या लग्न झालेल्यांच्या लग्नाच्या वाढदिवसाची सुद्धा. कुणाच्याही किंवा घरातल्या लग्नसमारंभामधील, मौजी बंधना-मधील आपल्या उपस्थितीची कथा हीच असते नाही?

पण ह्या प्रत्येक वेळी आपण हे प्रसन्नतेचे मुखवटे परिधान करतो. खरं तर मागच्या वर्षामधल्या व्यसनांसकट व्यसनी मंडळी हे दिवस व्यसनांच्या साथीसंगतीनं साजरे करतात. तेही चुकीच्या आचरणा-सह, चुकीचे विचार बरोबर घेऊनच आणि तसेच नवीन वर्षातही पदार्पण करतात. आपणही आपल्या समग्र गुणदोषांसकट नवीन वर्षात येतो.

जेव्हा आपण स्वत:ला आमूलाग्र बदलण्याची गरज असेल तर तसं बदलून, मागच्या वर्षामधल्या चुका मागे सोडून व्यसनांमधून पूर्णपणे मुक्त होऊन, चुकीच्या विचारांना जुन्या वर्षाच्या अंधारात गाडून टाकून नवीन वर्षाचं स्वागत करू तेव्हाच ती खऱ्या अर्थानं नववर्षाची सुरूवात ठरेल.

आणि जर मागच्या वर्षातलंच काहीतरी बरोबर घेऊनच जुन्या वर्षाचा उंबरठा ओलांडायचा असेल तर आपल्यामधले चांगले गुण, दुसऱ्यांना मदत करण्याची वृत्ती, आपल्यामधील एखादी कला किंवा चांगली विद्या, परोपकार हे घेऊन हा उंबरठा ओलांडूया. पण परवडत नसतानाही केवळ दुसऱ्याशी स्पर्धा करायची म्हणून महागड्या हॉटेलांमध्ये टेबल आरक्षित करून तिथं मिळणाऱ्या भेटवस्तू मिरवत (खरं तर त्या आपण भरलेल्या पैशांच्याच असतात) झोपेनं किंवा मद्यपान करणाऱ्या सारख्यांचे मद्यपानानं तारवटलेले डोळे घेऊन घरी यायची नी नवीन वर्षाचा पहिला दिवस झक्कपैकी ताणून देण्यात घालवण्याची काहीही गरज नसते. म्हणून नववर्ष तनमनात भरा आणि रोज व्यक्त करा. हे सर्वांनीच करायला हवं. तरच एकमेकांना शुभेच्छा देणं व घेणं हे वरवरचं न ठरता ते खरं मनापासून शुभचिंतन ठरेल.

*

(पान २ कॉलम ४ वरून)

जोडीदाराचे पौरुषत्व/स्त्रीत्व शंकास्पद असेल तर? कित्येकांना विवाहानंतर जोडीदारातील दोष लक्षात येतो; पण गप्प राहून सहन करण्यापलीकडे ते काहीच करू शकत नाहीत. पूर्वीच्या काळी, स्वत:चा दोष नसताना, कित्येक स्त्रियांना 'वांझ' असल्याची नामुष्की झेलत अपमानित जीवन स्वीकारावे लागत होतेच ना? व्यवसायानिमित्त घराबाहेर अधिक काळ राहणाऱ्या पुरुषांना शरीर सुखाची सोय करणे तसे सोपे जाते. स्त्रियाही आपल्याला जमेल तशी स्वसुखाची सोय करतात. पण सर्वांनाच हे जमते असे नाही. पुष्कळ जण असलेल्या परिस्थितीचा स्वीकार करतात आणि उर्वरीत आयुष्य बिनबोभाट जगतात. काहीजण वेगळं होणं स्वीकारतात. शिक्षणामुळे, जागरूकतेमुळे आणि आर्थिक स्वातंत्र्यामुळे हल्ली हे शक्य होतं. पण वेळीच उपाय केला नाही तर काहीजण वाहत जातात आणि नको ते करून बसतात. कुटुंबात किंवा ओळखीत होणारे विनयभंग आणि बलात्काराचे प्रकार कदाचित् यातूनच होत असतील. अशी माणसे स्वत:च्या क्षणिक सुखासाठी दुसऱ्याचे आयुष्य उध्वस्त करतात.

अशा विविध परिस्थितीत अडकलेले पुष्कळ जण लोकलाजेस्तव किंवा आपली व आपल्या कुटुंबाची इभ्रत जपण्याकरिता गप्प राहतात. सारे काही आलबेल आहे असे भासवतात. शरीराने घरात आणि मनाने बाहेर असे दुहेरी आयुष्य जगतात. काही शेवटचा मार्ग म्हणून घटस्फोट घेतात. काही नवीन संसार थाटतात. अशा परिस्थितीत खूपवेळा प्रथम विवाहातून झालेली मुले त्यात होरपळतात. सामान्यत: प्रत्येक आईबापाला आपल्या मुलांची काळजी असते. त्यांच्यावर मनापासूनचे प्रेम असते. म्हणूनच अधिकतर जोडपी मुलांचा विचार करून आपल्यातील वाद विसरून, आपल्या इच्छेला मुरड घालून एकत्र राहतात. वेगळे झाल्यावरही आईबाप आपल्या मुलांवर प्रेम करतच राहतात आणि नियमितपणे त्यांना भेटून आपले नाते टिकवून ठेवतात. परंतु काही माणसे, एकमेकांपासून फारकत घेतल्यावर, तीव्र द्वेष भावनेने किंवा वासनेच्या आहारी जाऊन चुकीचा मार्ग अवलंबतात, पूर्वायुष्यातील खुणा, आठवणी आणि काहीवेळा नातीसुद्धा मिटवण्याचा प्रयत्न करतात. जसे सुरुवातीस दिलेल्या गोष्टीतील आईने केले.

जेव्हा कुणीही शारीरिक किंवा मानसिक व्यभिचार करतो/ते, तेव्हा कदाचित त्यांच्यासाठी तो शेवटचा मार्ग असू शकतो. याचा अर्थ असा मुळीच होत नाही की स्वत:च्या घरात सुख मिळाले नाही की प्रत्येकाने घराबाहेर शोधावे. आपल्या देशात तरी शंभरात नव्वद टक्के लोक आपल्या वैवाहिक जीवनात राहून आपल्यातील मतभेद मिटवण्याचा प्रयत्न करतात. लग्न वाचवणे फार महत्त्वाचे असते. कारण घर आणि कुटुंब याचे महत्त्व आपल्याला अगदी लहानपणापासून शिकवले जाते. हा विषय सर्वव्यापी आणि प्रदीर्घ आहे. खोलात शिरून लिहायचे झाले तर कित्येक पाने लिहावी लागतील आणि त्यातील कित्येक विचार वादग्रस्त ठरतील. पण विषय कोणताही असो; प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. आपण करतो ते पुण्य आणि दुसरे करतात ते पाप असं नसतं. स्वत:च्या पती किंवा पत्नीवर प्रेम करत असतानासुद्धा दुसरी एखादी व्यक्ती कुणालाही आवडू शकतेच की. पण म्हणून ते व्यभिचारी ठरत नाही.

जसे शिक्षणामुळे घटस्फोट होवू शकतात तसेच शिक्षणामुळे संसार वाचूही शकतात. जर प्रत्येकाने आपला अहंकार बाजूला ठेवला, आपल्या जोडीदाराला थोडे समजून घेतले, त्याला/तिला थोडी मोकळीक दिली, तसेच स्वत:च्या मनाला मोकळा विचार करायची सवय लावली तर कित्येक आयुष्यं सुखी आणि आनंदी होवू शकतात.

अग्नीभोवती सात पाऊले एकत्र चालताना जी वचने दिली जातात ती आपण कितपत पाळतो हा प्रश्न प्रत्येकाने स्वत:ला विचारावा. घराच्या वा स्वत:च्याच भल्याकरता आपल्या वर्तनात त्याप्रमाणे जमेल तितका बदल करावा. म्हणूनच अंतरपाट दूर होण्यापूर्वी गुरुजी आणि आप्तेष्ट सतत विवाहेच्छुकांना सांगत असतात 'सावधान'!

*

# डस्ट बिन

**-सौ. जयमती जयपाल तळपदे**

*(यावर्षी जयमती तळपदे यांचे लेखन प्रभुतरुणातून 'आलटून पालटून' तुमच्या भेटीला येईल. -संपादक)*

प्रज्ञाने खिडकीबाहेर पाहिले. रस्ता नेहमीसारखाच शांत पहुडला होता. तशी ह्या रस्त्याला फारशी रहदारी नसायचीच. त्यामुळे पहाण्यासारखेही काही नसायचे. एमिलीचा आत्ताच फोन येऊन गेला होता. तीही हिच्यासारखी एकटीच. थोडा वेळ गप्पा मारून झाल्या. पण बोलणार तरी काय, आणि कशावर?

हल्ली संध्याकाळ झाली की प्रज्ञाला हे एकटेपण फारच जाणवायचे. तिच्यासारख्या काही भारतीय बायकापण होत्या. पण त्यांना त्यांची कुटुंबे, म्हणजे मुख्यत्वे नवरा बरोबर होता. इथे अमेरिकेत असे रोजरोज कुणाकडे जाणे कठीणच. हां, आता शनिवार रविवार मात्र अशी मित्रमैत्रिणींकडे जाणीयेणी व्हायची. पण इतर दिवसांचे काय? नंद, म्हणजे तिचा नवरा गेल्यापासून ती फारच एकटी पडली होती. मुलाकडे जायचे तर तो इकडे अमेरिकेतच पण शेकडो मैल लांब. बरं फार दिवस त्यांच्याकडे राहिलेलेसुद्धा त्याच्या बायकोला आवडले नसते.म्हणजे, असे आपले हिला वाटायचे.

बरोब्बर तीस वर्षापूर्वी ती नंदबरोबर इथे आली. म्हणजे एक दोन स्थळे पाहिल्यावर हिने आईला बजावूनच सांगितले; ''हे बघ आई, माझ्यासाठी एकुलता एक मुलगा बघ. भारताबाहेरचाच बघ, म्हणजे घरात ती माणसांची गर्दी नको.' प्रज्ञा एकुलती एक मुलगी. दिसायला छान, अभ्यासात हुशार. त्यामुळे लाडावलेली. बरे आई आणि बाबा दोघांकडचीही कुटुंबे तशी लहानच. म्हणजे प्रज्ञाला एकच मावशी आणि एकच आत्या. घरात खरे तर बाबांची आई होती. पण तिचे 'हे नको करू', 'ते नको करू, शुभंकरोति म्हण.' ह्या सगळ्याचा तिला फार जाच वाटायचा. आजीने केलेले लाडसुद्धा तिला आवडायचे नाहीत. तिची आई नोकरी करायची. आजीच्या लाडामुळे प्रज्ञा बिघडेल असे समजून लहानपणापासून प्रज्ञाला पाळणाघरातच ठेवले होते. त्यामुळेसुद्धा तिला आजीचा लळा लागलाच नाही.

प्रज्ञाने ग्रॅज्युएशन केले. नंतर एच.आर.मध्ये एम.बी.ए. सुद्धा केले. आता तिच्यासाठी स्थळे पहायला सुरूवात झाली. तिच्यासाठी पहिले स्थळ आणले ते मावशीने. धीरज दिसायला स्मार्ट, चांगला शिकलेला व स्वत:चा बिझनेस असणारा होता. दोघांचा जोडा शोभून दिसला असता. स्वत:चा बंगला बांधत होता. घरात आईवडील, त्याची आजी आणि लग्नाला आलेली बहीण असा परिवार होता. पहिली भेट बाहेरच झाली. प्रथम दर्शनी दोघेही एकमेकांना पसंत पडले. पण दुसऱ्या भेटीत काय झाले कोण जाणे, धीरजकडून नकार आला. कारण कळलेच नाही. 'माझे हिच्याशी जमणार नाही', एवढेच कारण दिले त्याने. त्याच्या घरच्यांनाही काही माहिती नव्हते. प्रज्ञा एवढेच म्हणाली, 'गेला उडत'. तिनेही काही कारण सांगितले नाही. तिला परतपरत विचारण्याची कुणाची हिंमतच नव्हती.

नंतर हे नंदचे स्थळ कुणीतरी सुचवले. तो तिथे अमेरिकेत नोकरी करत होता. त्याची आई पुण्यात रहात होती. ती अमेरिकेला नंदकडे जाऊन आली होती. पण तिला काही तिथे फारसे आवडत नव्हते. म्हणजे लग्न झाल्यावर तर ती परत अमेरिकेला त्यांच्याकडे जाऊन रहाण्याचा प्रश्नच नव्हता. लग्न थाटामाटात पार पडले आणि नवविवाहीत दांपत्य अमेरिकेला निघून गेले. प्रज्ञाने तिथे जाऊन काही शैक्षणिक कोर्सेस केले व तिलापण तेथे नोकरी मिळाली. ती तिथे नोकरी आणि मित्रमैत्रिणीत रमून गेली. तिच्या बाळंतपणात एकदा तिचे आईबाबा आणि नंतर सासूबाई सहासहा महिने राहून गेले. ती मात्र भारतात एकदाच आली. तिचे वडील गेले तेव्हा. सासूबाई गेल्या तेव्हा नंद जाऊन आला. त्याची इच्छा होती की बाळाला घेऊन जावे म्हणून. पण प्रज्ञाच म्हणाली, ''कशाला त्याला हा हवापाण्याचा बदल हवा? त्याला नाही झेपले तर आपल्याला तिथे जाऊन पण त्रासच.'' नंदचा स्वभाव तसा शांत. त्याला झगडे, कटकटी नको वाटायच्या. त्यामुळे त्याचा संसार व्यवस्थित झाला आणि एक दिवस अचानक हार्टअटॅकने नंद बसल्याजागीच हे जग सोडून गेला.

त्या शनिवारी सगळे मित्रमैत्रिणी भेटले असताना शरयू उत्साहात सगळ्यांना सांगत होती, ''ए, आम्ही पुढच्या महिन्यात इंडियाला जातोय.'' एका क्षणात वातावरण बदलले. आता भारतातल्या कितीतरी गोष्टींवर चर्चा सुरू झाली. क्षणभर प्रज्ञालाही वाटले, जावे का आपण परत भारतात?' पण कुठे जाणार? कुणाकडे आणि कशाला? आणि जादूची कांडी फिरावी तसा तिचा फोन वाजला. तिची मावशी पुण्याहून बोलत होती, 'प्रज्ञा कशी आहेस? अगं, माझ्या नातीचे लग्न आहे. तुला आमंत्रण द्यायला फोन केलाय. नक्की ये. त्यानिमित्ताने सगळे भेटतील. किती वर्षात तुला पाहिलंच नाही. आता मी काय गं, पिकलं पान. कधी गळेल सांगता येत नाही. त्यापूर्वी एकदा तुला पहावसं वाटतंय.

जरूर ये. माझ्याकडेच उतर. तुला बंगल्याचा पत्ता पाठवतेय'' प्रज्ञाला काही बोलू न देताच मावशी बोलत होती.'' ''बघते जमतं का ते'' म्हणत प्रज्ञाने फोन बंद केला. पण मनाने मात्र जायचं नक्की केले होते.

मावशीला आश्चर्याचा धक्का द्यायचा म्हणून प्रज्ञा तिला न कळवताच अमेरिकेहून मुंबईला आणि टॅक्सीने पुण्याला मावशीकडे आली. बंगल्याचे नाव होते 'आदर'. मालकाचे नाव गेटवर लिहिले होते 'इनामदार्स'. तिला पाहून मावशी आणि तिची मावसबहीण खूपच खुश झाल्या. आगतस्वागत झाल्यावर प्रज्ञाने चौकशी केली, ''अगं, लेक कुठे आहे तुझी?'' मावसबहीण म्हणाली, ''ती तिच्या बाबाबरोबर खरेदीला गेली आहे.'' एवढ्यात एक वयस्कर स्त्री पुढे आली. मावसबहिणीने ओळख करून दिली. ''ह्या माझ्या सासूबाई,'' प्रज्ञाने हात जोडले. ''नमस्कार!'' तिच्या मनात झटकन विचार आला, ''एवढी म्हातारी माणसे गोळा करून हिचं कसं काय निभावतं कोण जाणे? पण तिची मावसबहीण किंवा मावशी किंवा त्या सासूबाई, यांच्यापैकी कुणीही त्रस्त दिसत नव्हते. सारे कसे हसरे आणि खुश वाटत होते. अर्थात वयाप्रमाणे त्या दोघींच्या चेहऱ्यावर थोडा थकवा आणि मामुली आजारपण जाणवत होते. तिने नकळत आपली तुलना त्यांच्याशी केली.

इतक्यात पूर्वा आणि तिचा बाबा आत आले. मावसबहिणीने ओळख करून दिली. ''ही माझी मावसबहीण प्रज्ञा. मी सांगितले होते ना, ती अमेरिकेला असते ती?'' भाऊजींनी हात जोडले. प्रज्ञाला एकदम वाटून गेले. ''हा चेहरा ओळखीचा वाटतोय. कुठे बरे पाहिलेय ह्यांना?'' एवढ्यात पूर्वा थोड्या वाटेतच असलेल्या डस्टबीनवर धडपडली, ''ए आई, हे डस्टबीन कशाला आलंय इथे मध्येच?''

आणि क्षणार्धात प्रज्ञाच्या मनात वीज चमकली. त्या बंगल्याचं काम चालू होतं. तो तिला उत्साहाने सर्व सांगत होता. त्याचं बंगल्याचं प्लॅनिंग सांगत होता. आणि अचानक तिने विचारले, ''तुमच्या घरात डस्टबीन्स किती आहेत?'' तो निरागसपणे उत्तरला, ''अजून इथे काम चालू आहे ना? एखादंच ठेवलंय.'' ''मी त्याबद्दल नाही बोलत. तुमच्या घरात म्हातारी माणसं किती आहेस असं विचारायचं आहे मला?'' तो चमकला, आश्चर्यचकीत झाला आणि हळूहळू त्याचा गोरा चेहरा लालबुंद झाला.

''आमच्या घरात म्हातारी माणसे नाहीत. माझे आईवडील आहेत आणि माझी आजी आहे. घरातील सर्व टाकाऊ कचरा आणि वस्तू जशा आम्ही डस्टबीनमध्ये टाकतो आणि घर स्वच्छ होते तसे आमची मने, वागणूक स्वच्छ ठेवण्याचे काम घरातील वडीलधारी माणसे करतात. पण आम्ही त्यांना डस्टबीन म्हणत नाही. कारण त्यांची जागा घरातल्या कुठल्याही कोपऱ्यात नसून आमच्या मनात आहे आणि मानाने ते आमच्यापेक्षा मोठे आहेत. आमच्या लहानपणी त्यांनी आम्हास देवाघरचे देणे समजून जी आमची सेवा केली आहे ते ऋण फेडण्याची संधी आम्हाला ईश्वराने आता दिली आहे असे मी समजतो. तुम्हाला कुठे सोडू मी?'' पुढे एक शब्दही न बोलता त्याने तिला तिच्या घराबाहेर सोडले आणि दुसऱ्या दिवशी आपला नकार कळवला. त्या मुलाचे नाव होते धीरज इनामदार आणि त्याने बंगल्याचे नाव ठेवले होते. 'आदर'.

## आनंद मेळावा

रविवार, दिनांक १० जानेवारी रोजी महिला समाजाचा ९६वा ९५ स्टॉल असलेला आनंद मेळावा सकाळी १० ते रात्री १० पर्यंत दिमाखात साजरा झाला.

प्रसिद्ध निर्माती व दिग्दर्शिका वैजयंती कुळकर्णी आपटे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. महिला समाजाला १०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांनी महिला समाजाचे कौतुक केले. सौ. पल्लवी कोठारे यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर अध्यक्षा सुबोध प्रधान यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. उपाध्यक्षा सौ. साया नवलकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाची आखणी सौ. नीता सेंजित यांनी केली. अर्थात कार्यकारी समितीच्या इतर भगिनींचे सहकार्य होतेच.

ड्रेस मटेरियल, साड्या, आर्टिफिशियल ज्वेलर्स, टप्पर वेअर, ऑरगॉनिक गार्मेन्टस्, वेगवेगळ्या पर्सेस, बॅग्स, आपले पाठारे प्रभुंचे विशेष खाद्यपदार्थ इत्यादीचा यात समावेश होता.

विशेष महत्त्वाचे म्हणजे महिला समाजाच्या शिवणक्लासचा स्टॉल होता. त्यात अनेक पिशव्या, हातरुमाल, बटवे इत्यादी वस्तू होत्या. अनेक महिलांनी चांगला प्रतिसाद दिला. शिवणक्लासच्या स्टॉलचे बॅनर श्री. भूषण विजयकरांनी केले.

श्री. कुणाल विजयकर, निर्माता-दिग्दर्शक-अभिनेता श्री. श्रेयस तळपदे यांनीही हजेरी लावली. ज्ञातीबांधव व भगिनींमुळे आनंद मेळावा यशस्वी झाला.

## परीक्षेतील सुयश

**कंपनी सेक्रेटरी (प्रोफेशनल प्रोग्राम एक्झामिमेशन)**

कु. क्षमा दिलीप वाझकर

**एम.बी.ए.**

कुणाल अशोक प्रधान

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ
श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ
सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

१५-९-१५ सौ. करिष्मा आणि श्री. स्वप्नील सुभाष कीर्तिकर, पुत्र, अंधेरी

### आत्याबाई नाव बोला

आरव स्वप्नील कीर्तिकर

### नांदा सौख्यभरे

२१-१२-१५ डॉ. विक्रांत सुशील धुरंधर, डॉ. नंदिता विजय मिरजकर (आं. ज्ञा.)
२५-१२-१५ श्री. संदेश दीपक राव, कु. वनिता काशिनाथ डेगे (आं. ज्ञा.)

### विवाह रौप्य महोत्सव

०२-१२-१५ श्री. नीलेश भालचंद्र कोठारे, कु. हर्षा गजानन देसाई
०८-१२-१५ श्री. समीर रंजन धैर्यवान, कु. शिल्पा शशिकांत शिंदे
१२-१२-१५ सौ. प्रीति आणि श्री. प्रदीप कुंजविहारी धुरंधर
१४-१२-१५ सौ. प्रियांका आणि डॉ. परेश विजयसेन नवलकर

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०५-११-१५ | श्री जतीन सखाराम जयकर | वय ८६ | बोरिवली |
| १४-१२-१५ | श्री. उदय सुंदरराव धुरंधर, | वय ७२, | दादर |
| २७-१२-१५ | श्री. गजानन रामराव कीर्तिकर, | वय ९०, | ठाणे |
| ०८-०१-१६ | श्री. अनंत वसंतराव राव, | वय ७८, | अंधेरी |
| १५-०१-१६ | श्री. हेमचंद्र गणपतराव प्रधान, | वय ८३, | अंधेरी |
| २०-०१-१६ | श्रीम. लीला गिरीधर राणे, | वय ८४, | खार |
| २१-०१-१६ | श्री. दत्तकुमार शंकर आनंदकर, | वय ८६, | गावदेवी |
| २६-०१-१६ | श्री. विनोद (विठू) मोरेश्वर कोठारे | वय ८८, | सातबंगला, अंधेरी |
| ३०-०१-१६ | प्रा. श्री. मकरंद वामन कीर्तिकर | वय ८९, | अंधेरी |

## प्रभुतरुणास देणगी

✶ श्रीम. कस्तुर रवीन्द्र तळपदे यांजकडून रु. १००१/-

✶ कुमार घृअंक अंकीता प्रनील कोठारे हा महाराष्ट्र राज्य बोर्डातर्फे मार्च २०१५ मध्ये झालेल्या पूर्व प्राथमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत उच्च श्रेणीत झळकल्याबद्दल सौ. अनिला आणि डॉ. प्रभाकर (आजी आजोबा) कोठारेंकडून रु. ५०१/-. घृअंकचे अभिनंदन.

✶ श्री. दिवाकर कोठारे यांच्या ७५ व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ सौ. सुजाता दिवाकर कोठारे आणि सौ. मेघना विवेक विजयकरकडून रु. ५००/-

श्री. दिवाकर यांना शुभेच्छा.

✶ सौ. आसिताक्षी दिलीप वाझकरकडून कन्या कु. क्षमा सी. एस् पास झाल्याबद्दल रु. २५१/-

## अभिनंदन

✶ सौ. श्रेया शैलेंद्र तळपदे या 'मिती चार, कल्याण' संस्थेच्या नाटकात सहभागी आहेत. अभिनंदन.

✶ डॉ. सुमन नवलकर या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील (पिंपरी, चिंचवड) निमंत्रितांच्या कविसंमेलनात सहभागी झाल्या. गतांकी त्यांचे आठ दिवाळी अंकात लेखन केल्याचा उल्लेख आहे. सुखद धक्का असा की त्यांचे तब्बल तीस दिवाळी अंकात लेखन असून 'चालना' दिवाळी अंकातील कथा स्पर्धेत त्यांच्या कथेला प्रथम पुरस्कार प्राप्त झाला. डॉ. विजया वाड आणि डॉ. निशिगंधा वाड संपादित बालवाङ्मयकोशाचे पाच खंड प्रकाशित झाले. त्यात डॉ. सुमन नवलकरांच्या तीन कथा आणि तीन कविता समाविष्ट आहेत. अभिनंदन.

✶ डॉ. विजया वाड आणि डॉ. निशीगंधा वाड संपादित उपरोक्त बालवाङ्मयकोशात सौ. कल्पना सुभाष कोठारे यांच्याही तीन कथा आणि तीन कवितांचा समावेश आहे. अभिनंदन.

✶ नुकत्याच दिल्ली येथे मीडियासाठी झालेल्या कारस्पर्धेत श्री. रौनक अजिंक्य यांना प्रथम पारितोषिक आणि ढाल प्राप्त झाली. अभिनंदन रौनक.

✶ 'महाराष्ट्र टाइम्स' मधील 'थॅक्यू' सदरात अनंत देशपांडे यांनी ग. रा. जयकर या अधिकाऱ्याच्या माणुसकीचा उल्लेख करीत त्यांना 'थॅक्यू' म्हटले आहे.

✶ आमचे व्यंगचित्रकार श्री. प्रदीप शामराव कोठारे यांच्या व्यंगचित्राचा 'हास्योपचार' या पुस्तकात समावेश झाला. अभिनंदन.

✶ श्री. नितीन वसंतराव देसाई (२२-१-१६) आणि सौ. आशा नितीन देसाई (पूर्वाश्रमीच्या आशा माधवराव कोठारे, २७-१-१६) यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस साजरा झाला. शुभेच्छा.

✶ विलेपार्ले येथे झालेल्या 'मॅजेस्टिक गप्पा'त श्री. श्रेयस तळपदे यांची मुलाखत रंगली. अभिनंदन.

(पान ४ कॉलम २ वरून)

तृतीय क्रमांक- डॉ. वैशाली नारायण अजिंक्य

२) **चित्रकला स्पर्धा**: (वेळ- ३० मिनिटे)

**अ-गट** : ५ ते ८ वर्षे, **विषय** : जोकर
प्रथम क्रमांक- कु. अदिती आशिष व्यवहारकर, द्वितीय क्रमांक- कु. आकांक्षा प्रसाद कोठारे, तृतीय क्रमांक- कु. आंचल शैलेश कोठारे

**ब-गट** : ९ ते १५ वर्षे, **विषय** : सर्कस
प्रथम क्रमांक- कु. यश शैलेद्र तळपदे,
द्वितीय क्रमांक- कु. रितिका राहुल जयकर,
तृतीय क्रमांक- कु. अरित प्रणव देसाई

**क-गट** :१५ वर्षांवरील, **विषय** : संक्रांत
प्रथम क्रमांक- श्री. नंदकुमार कृष्णराव विजयकर, द्वितीय क्रमांक- श्री. श्रीपाद सुनील आगासकर, तृतीय क्रमांक- सौ. शीतल आशिष व्यवहारकर

३) **हस्तकला स्पर्धा**: (वेळ- ३० मिनिटे)

**अ-गट** : ५ ते ८ वर्षे **विषय** : कार्डपेपरचा रंगीत मासा बनविणे.
प्रथम क्रमांक- कु. पर्जन्य पवन कीर्तिकर,
द्वितीय क्रमांक- कु. काव्या प्रणव देसाई,
तृतीय क्रमांक- कु. आंचल शैलेश कोठारे

**ब-गट** : ९ ते १५ वर्षे, **विषय** : पेन्सिल शेवपासून फुले तयार करणे, (किमान पाच)
प्रथम क्रमांक- कु. रितिका राहुल जयकर,
द्वितीय क्रमांक- कु. वरुण राकेश राणे

**क-गट** :१५ वर्षांवरील, **विषय** : कार्डबोर्डचा ट्रे तयार करून सजविणे.
प्रथम क्रमांक- श्री. नंदकुमार कृष्णराव विजयकर, द्वितीय क्रमांक- सौ. श्वेता असित तळपदे

४) **संगीत स्पर्धा**:

**अ-गट** : ५ ते ८ वर्षे **विषय** : साभिनय कविता सादर करणे. (ॲक्टिंग साँग)
प्रथम क्रमांक- कु. अदिती आशिष व्यवहारकर, द्वितीय क्रमांक- कु. अवंती असित तळपदे, तृतीय क्रमांक- कु. अश्विन असित तळपदे

**ब-गट** : ९ ते १५ वर्षे, **विषय** : चित्रपट गीत
प्रथम क्रमांक- कु. वरुण राकेश राणे,
द्वितीय क्रमांक- कु. वैष्णवी रितेश वाझकर

**क-गट** :१५ वर्षांवरील, **विषय** : गझल
प्रथम क्रमांक- श्रीमती क्षमा पद्मकुमार कोठारे,
द्वितीय क्रमांक- सौ. स्वप्ना विनित जयकर

५)**वेशभूषा स्पर्धा**: (वेळ- ३ मिनिटे)

**अ-गट** : ५ ते ८ वर्षे
प्रथम क्रमांक- कु. आश्वि सौरभ धराधर,
द्वितीय क्रमांक- कु. अवंती असित तळपदे,
तृतीय क्रमांक- कु. पर्जन्य पवन कीर्तिकर

**ब-गट** : ९ ते १५ वर्षे
कु. रितिका राहुल जयकर, (समाजाचे बक्षिस)

**क-गट** : १५ वर्षांवरील
श्री. नंदकुमार कृष्णराव विजयकर (समाजाचे बक्षीस).

६) **एकपात्री अभिनय स्पर्धा**: (वेळ- ५ मिनिटे)
(कै. विजय बाळाराम राणे स्मरणार्थ)

**अ-गट** : ५ ते ८ वर्षे, **विषय** : गोष्ट सांगणे.
प्रथम क्रमांक- कु. पर्जन्य पवन कीर्तिकर,
द्वितीय क्रमांक- कु. वैष्णवी रितेश वाझकर,
तृतीय क्रमांक- कु. आदिती आशिष व्यवहारकर

**ब-गट** : ९ ते १५ वर्षे, **विषय** : एकपात्री अभिनय
प्रथम क्रमांक- वरुण राकेश राणे, (समाजाचे बक्षिस)

**क-गट** :१५ वर्षांवरील, **विषय** : मराठी टी.व्ही. मालिकेतील कोणतीही व्यक्तिरेखा.
प्रथम क्रमांक- श्रीमती क्षमा पद्मकुमार कोठारे, द्वितीय क्रमांक- श्री. नंदकुमार कृष्णराव विजयकर, तृतीय क्रमांक- सौ. स्वप्ना विनित जयकर

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर
RNI NO. 14613/67